हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर, नाशिक यांच्या मालकीच्या ओझर येथील विमानतळावरील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या Airport Terminal Building (ATB) चे भाडे जमा करण्यासंदर्भात.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.२०३/२८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. २४ जुलै, २०१९

<u>वाचा</u> : **१. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर व महाराष्ट्र शासन यांच्यातील सामंजस्य करार दि. ३.०३.२०११**
२. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर व महाराष्ट्र शासन यांच्यात दि.३.०३.२०११ रोजी झालेल्या सामंजस्य कराराचे शुध्दिपत्रक दि. १.०८.२०१५
३. शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.४१/२८-अ, दि.१७.०१.२०१९

<u>प्रस्तावना :</u>

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर, नाशिक यांच्या मालकीच्या ओझर येथील विमानतळावर महाराष्ट्र शासनाने रु.८४.५२ कोटी रुपये खर्च करुन Airport Terminal Building (ATB) बांधली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र शासन व हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड यांच्यात दि.३ मार्च २०११ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून दि.१ ऑगस्ट २०१५ राजी सदर सामंजस्य करारात सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सामंजस्य करारामधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने बांधलेली Airport Terminal Building हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड ला ३० वर्षे कराराने रु.१०००/- प्रति वर्ष दराने भाड्याने देण्याबाबत शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. याअनुषंगाने, प्रतिवर्ष रु.१०००/- भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जमा लेखाशीर्षाखाली शासन जमा करण्यासाठी कार्यपध्दती विशद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर, नाशिक यांच्या मालकीच्या ओझर येथील विमानतळावर महाराष्ट्र शासनाने बांधलेल्या Airport Terminal Building (ATB) बाबत करण्यात आलेल्या भाडेकरारनाम्यानुसार कराराच्या कालावधीत रु.१०००/- प्रतिवर्ष एवढी रक्कम हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड यांनी शासनाकडे जमा करावी.

२. सदर प्रक्रिया सोयीची व्हावी याद्दष्टीने हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने भाड्याची रक्कम संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, हँगर क्र.६, विले पार्ले (पू.), मुंबई-४०० ०५६ यांचेकडे चेक/ डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी व संचालक, विमानचालन संचालनालय यांनी सदर रक्कम **जमा लेखाशीर्ष ००५९, सार्वजनिक बांधकामे, स्थूल बेरीज-००५९, सार्वजनिक बांधकामे, ०१, कार्यालयीन इमारती, ०११, भाडे, (००) (०१) भाडे, ००५९ ००११** या लेखाशीर्षाखाली जमा करावी.

३. प्रतिवर्ष भाड्याची रक्कम उपरोक्त नमूद जमा लेखाशीर्षाखाली शासनखाती जमा केल्यानंतर त्याबाबतचा कार्यपालन अहवाल १ महिन्याच्या आत संचालक, विमानचालन संचालनालय यांनी शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०७२४१६१६१४१७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e64564546661363400c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.07.24 16:21:13 +05'30'

(भ. बु. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सह सचिव
४. प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
५. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
६. महाव्यवस्थापक, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड, ओझर, नाशिक
७. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०.निवड नस्ती.